# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ०४/२०२०** | **दिनांक १४/०१/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


| | | |
|---|---|---|
| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०८/०१/२०२० ते १४/०१/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १५/०१/२०१९ सकाळी ८:३० पासून १९/०१/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८/०१ | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ | १४/०१ | | १५/०१ | १६/०१ | १७/०१ | १८/०१ | १९/०१ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३२.० | ३२.० | २९.४ | ३२.० | ३३.४ | ३२.६ | २९.६ | कमाल तापमान (अं.से) | २७ | २७ | २४ | २६ | ३० |
| १८.८ | १६.० | १५.८ | १९.४ | १८.६ | १८.६ | १८.६ | किमान तापमान (अं.से) | १४ | १३ | ११ | १३ | १६ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | मेघाच्छादन (ऑक्टा) | २ | १ | ० | १ | २ |
| ९० | ७४ | ७५ | ६७ | ९६ | ९४ | ८३ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६५ | ६७ | ५७ | ५७ | ४८ |
| ५५ | ४२ | ४५ | ४१ | ४५ | ६७ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४६ | ३६ | ३३ | २४ | २५ |
| १.६ | ३.७ | ४.७ | ३.२ | २.५ | २.२ | २.७ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ९ | ८ | ११ | ११ | ९ |
| शांत | नै. | नै. | इ.उ. | शांत | शांत | इ.पू. | वाऱ्याची दिशा | ई.पू. | ई.पू. | पु. | ई.पू. | आ.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १५ ते १९ जानेवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात घट संभवत असून आकाश निरभ्र राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **वाल** | **फुलोरा अवस्था** | • वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या प्रादुर्भावामुळे पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **चवळी** | **फुलोरा अवस्था** | • चवळी पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किडीच्या प्रादुर्भावामुळे पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **आंबा** | **बोंगे फुटणे ते मोहोर अवस्था** | • हवामान पुर्वानुमानानुसार आंब्याला मोहोर फुटण्यास पोषक वातावरण तयार होत असल्याने आंबा मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार दुसरी फवारणी बोंगे फुटताना, कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी लॅम्बडासायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. + हेक्झाकोनाझोल ५% प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून करावी.<br>• तसेच मोहोर फुटलेल्या ठिकाणी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे तुडतुडे, फुलकिडी तसेच मिजमाशीचे नियंत्रण होवू शकेल व त्याचा परपरागीकरण करणाऱ्या कीटकावर होणारा परिणाम टाळता येईल. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| **नारळ** | **-** | • नारळावर रूगोज स्पायरलींग व्हाईट फ्लायचा प्रादुर्भाव आढळून येत असून माशीच्या प्रादुर्भावामुळे पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येत आहे. यासाठी बागेचे नियमित सर्वेक्षण करावे व नियंत्रणासाठी इमिडॅकलोप्रिड १७.८ टक्के प्रवाही ३ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे तसेच पानावरील काळ्या बुरशीच्या नियंत्रणासाठी स्टार्च १० ग्रॅम प्रति १० लिटर द्रावणाची फवारणी करावी. |
| **वांगी** | **फळधारणा** | • वांगी पिकास प्रति एकरी क्षेत्रास ४३ किलो युरिया खताची तिसरी मात्रा पुर्नलागवडीनंतर दोन महिन्याने देण्यात यावी. |
| **मिरची** | **फुलोरा अवस्था** | • मिरची पिकास प्रति एकरी क्षेत्रास ३२ किलो युरिया खताची मात्रा फुलोऱ्या अवस्थेत देण्यात यावी. |
| **कोबी** | **वाढीची अवस्था** | • कोबी पिकामध्ये मावा, गड्डा पोखरणाऱ्या अळ्या, लाल कोळी किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने नियंत्रणासाठी गड्डे धरल्याबरोबर १० मि.ली. ५० टक्के मॅलेथीऑन प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १० ते १२ दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या कराव्यात. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी कोमट व स्वच्छ पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी.<br>• पशु वैदकांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष्यांना रानीखेत प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.<br>• किमान तापमानात घट संभवत असल्याने रात्रीच्या वेळेस जनावरांच्या गोठयात तसेच कोंबड्यांच्या शेड मध्ये गरजेनुसार विजेचे बल्ब आणि शेडभोवती पडदे गुंडाळावे व दिवसा गोठयाची दारे व खिडक्या खुली ठेवावीत जेणे करून हवा खेळती राहील. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**